# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/४९४/२०१४/११

**तक्रार दाखल दिनांक :- ११/०३/२०१४**
**निकाल दिनांक :- ०९/०५/२०१४**

**श्री,पुंडलीक बाबुराव पवार** **तक्रारदार**
**मु. पोस्ट बहीरगांव**
**ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद.**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.ग्रामीण मंडळ औरंगाबाद.** **गैरअर्जदार**

**मंच सदस्य**

**श्री. वि. स. काबरा सदस्य**
**श्री. सु. कि. नरवडे सदस्य/सचिव**

अर्जदाराने दिनांक ०९.०१.२०१४ रोजी कृषी संजिवणी योजनेचा लाभ न मिळणे बाबत मा. अधिक्षक अभियंता कार्यालय अंतर्गत तक्रार निवारण कक्ष ( सं व सु ) मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि. मर्या, औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली होती . त्या तक्रारीचा दिलेला आदेश दि. २१.०१.२०१४ रोजीचा मान्य नाही

कारण दि. ३१.१२.२०११ रोजी पर्यत दुष्काळी परिस्थितीमुळे व विहरीला पाणी नसल्यामुळे मध्यंतरीच्या काळात विज बील भरणा अर्जदाराकडून झालेला नाही तरी कंपनीकडून कृषी संजीवनी योजना दिनांक ३१.१२.२०११ निघालेली होती. त्या अनुषंगाने जे सप्टेंबर २०११ चे विज बील देण्यात आले रु. १९३५७.२०

पैकी कंपनीकडून सहाय्यक अभियंता  कन्नड यांनी रु. १३०००/- चा वीज बील तयार करुन दिले व ही रक्कम जर दि. ३१.१२.२०११ रोजी भरली तर कृषी संजीवनी योजने अंतर्गत राहिलेली पूर्ण वीज बील माफ होईल. असे सांगितले त्यामुळे दिलेले पूर्ण रु. १३०००/- वीज बील दि.  ३१.१२.२०११ रोजी भरलेले आहे.

परंतु  मार्च  २०१२ च्या बिलामध्ये कृषी संजीवनी योजनेचा लाभ न देता मुळ रक्कमेतुन भरणा केलेली रक्कम  वजा करुन अधिक ३ महिन्याचे वीज बील असे एकूण रु. ११,८०५,०७  असे दिनांक ३१.०३.२०१२ च्या वीज बीलामध्ये थकबाकी दाखविण्यात आली आहे. हे चुकीचे वीज बील रदद करुन नवीन वीज बील कृषी संजीवनी योजनेचा लाभ दयावा अशी तक्रार दि. ३१.०५.२०१३ रोजी कन्नड येथे सहाय्यक अभियंता यांना दिली त्यांनी सदर तक्रार दखल न घेतल्यामुळे दि. ०९.०१.२०१४ रोजी मा. अधिक्षक अभियंता  अंतर्गत तक्रार निवारण कक्ष ( सं व सु ) मंडळ कार्यालय म.रा.वि.मर्या. येथे तक्रार दाखल केले.

परंतू त्यांनी दि. ३१.०१.२०१४ च्या आदेशात समाधारन कारक उत्तर न देता समाधान नसेल तर ग्राहक ग्र-हाने निवारण मंच औरंगाबाद परिमंडळ विदयुत भवन औरंगाबाद यांच्याकडे अपील करावे असे सांगितले.

त्यामुळे अर्जदार मंचाच्या  निदर्शनास आणु इच्छितो की दि. ३१.०१.२०११ रोजी कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळण्यासाठी सर्व ग्राहकाला सहाय्यक अभियंता कन्नड येथून कृषी संजीवनी योजने अंतर्गत पूर्ण फायदा होईल असा प्रकारच्या हिशोब करुन वीज बील तयार करुन देण्यात येत होते. त्यामुळे अर्जदारास सप्टेबर २०११ च्या वीज बीलावर आधारीत हिशोब करुन रु. १३०००/- भरण्याचे सांगितलेले होते व ते दिनांक ३१.१२.२०११ रोजी  भरलेले आहे. अर्जदाराने त्यांचे तक्रारीमध्ये असे निदर्शनास आणुन दिले कि ,  त्यांनी इतर दोन मोटर पंपाचे वीज बील त्याच दिवशी तयार करुन दिलेले वीज भरले असता पुढे दोन्ही मोटर पंपाचा वीज बीलामध्ये कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळालेला आहे. परंतु एका वीज बिलामध्ये सहाय्यक अभियंता ,

कन्नड यांनी तयार करुन दिलेले वीज बीलामध्ये चुक असल्यामुळे आम्हाला योजनेचा लाभ मिळालेला नाही. हि सर्वस्वी चुक कंपनीची असून कृषी संजीवनी योजनेचा लाभ देवून न्याय देण्यात यावा अशी विनंती केली.

गैरअर्जदार म.रा.वि.वि.कं.मं. यांनी त्यांची बाजु मंचासमोर मांडतांना सांगीतले की अर्जदार श्री. पुंडलीक बाबुराव पवार रा. बहीरगांव यांनी कृषी संजीवनी २०११ अंतर्गत त्यांचे वीज बीलाचा भरणा रु.१३०००/- दि. ३१.१२.२०११ रोजी केला आहे. कृषी संजीवनी २०११ या योजनेनुसार डीसेंबर २०१० अखेरची मुळ रक्कम ८२१६.९१ रुपये व त्यावरील १२ टक्कयांनी व्याज रु. ९८६ , त्यापुढील चालू वीज बील इंधन समायोजन आकारासह म्हणजेच माहे मार्च २०११ रुपये ११४३.३२ जुन २०११ रुपये १०७७.३२, सष्टेबंर २०११ रुपये १४६५.५१, व माहे डिसेंबर २०११ रुपये २०६१.२७ असे एकुण रुपये १४९५०.३३ , न भरल्यामुळे म्हणजेच ( १४९५०.३३ - १३००० = १९५०.३३ ) रुपये १९५०.३३ , कमी भरल्यामुळे सदरहु ग्राहक हा कृषी संजीवनी योजने पासून वंचित राहिला व कृषी संजीवनी योजनेनुसार ग्राहक थकबाकीत असून त्यामुळे कृषी संजीवनीचा लाभ मिळाला नाही. असे सादर करुन सी.पी.एल व कृषी संजीवनी २०११ योजनेचे वाणिज्य परिपत्रक क्रमांक १३४ दि. ०१.०४.२०११ , वाणिज्य परिपत्रक क्रमांक १७६ दि. १४.०९.२०१२ सादर केले दोन्ही बाजुचे म्हणणे मंचासमोर सादर केल्यानंतर व मंचासमोर सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजानुसार खालील बाबी स्पष्ट होतात .

अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी कृषी संजीवनी २०११ या योजनेअंतर्गत सप्टे २०११ चे देयक दि. ३१.१०.२०११ रोजी दिल्याचे मंचासमोर सादर केले असल्याचे स्पष्ट होते . सदर सष्टेंबर २०११ अखेरच्या देयकाची एकूण रक्कम १९३५७.२० रुपये इतकी असून बीलावर निर्देश दिल्याप्रमाणे अर्जदाराने रुपये ८२१६.९१ ,जुन २०११ पूर्वी भरावे किंवा मुळ थकबाकी १२ टक्के व्याजासह ३१.१२.२०११ पर्यन्त भरावी असे स्पष्ट केले आहे . या अनुषंगाने सहाय्यक अभियंता , कन्नड यांनी त्यांचे सही व शिक्यानिशी रुपये १३०००/- चे देयक अर्जदारास कृषी संजीवनी २०११ चा लाभ मिळणेसाठी तयार करुन दिले व अर्जदाराने

सदर बील रुपये  १३०००/- दिनांक ३१.१२.२०११ रोजी  पावती क्रमांक १८६९७८४ अन्वये भरणा केला . गैरअर्जदार यांने कृषी संजीवनी २०११ चा लाभ मिळण्यासाठी भरावयाचे वीज बील सर्व हिशोब करुन दिले व सदर रक्कम अर्जदारने भरणा केले .गैरअर्जदाराने रुपये १३०००/- इतक्या रक्कमेचे देयक तयार केले असतांना त्यामध्ये जर काही तफावत असेल तर तसे अर्जदारास मार्च २०१२ पर्यन्त  फरकाची देयक भरणे बाबत कळवले असते तर सदर रक्कमेचा भरणा करुन अर्जदार कृषी संजीवनी योजना २०११ चा लाभ मिळणेसाठी पात्र ठरला असता . वाणिज्य परिपत्रक क्रमांक १५३  दिनांक  ०३.०१.२०१२ चा संदर्भ पाहता सदर योजनेचा कालावधी मार्च  २०१२ पर्यन्त वाढवण्यात आला होता. गैरअर्जदार हे  ०३.०१.२०१२  पासुन ३१.०३.२०१२ पर्यन्त या तीन महिन्याच्या कालावधीत अर्जदारास योजनेचा लाभ मिळण्यासाठी त्यांनी केलेल्या हिशोबातील त्रुटीबाबत कळवु शकले असते व फरकाचे देयक देवु शकले असते परंतु गैरअर्जदाराकडून तसे अर्जदारास कळविल्याचे किंवा फरकाच्या रक्कमेचे देयक अर्जदारास दिल्याचे या मंचापुढे सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कृषी संजीवनी योजना  २०११ चा लाभ मिळणेसाठी कमी रक्कम भरली हे गैरअर्जदाराचे म्हणणे ग्राहय करता येणार नाही . तसेच वाणिज्य परिपत्रक क्रमांक १७६ दिनांक  १४.०९.२०१२  मध्ये सुचना खालीलप्रमाणे दिलेल्या दिसुन येतात .

'' **कृषी संजीवनी योजना २०११** ''  ची अंमलबजावणी करताना असे आढळून आले की, काही ग्राहकांनी योजनेच्या कालावधीतील चालु विज देयकांचा भरणा देय दिनांकानंतर परंतु योजनेच्या कालावधीत केल्यामुळे योजनेच्या अटीप्रमाणे अशा ग्राहकांना योजनेत सहभाग घेऊनही सदर योजनेचा लाभ देता येत नव्हता.

वरील बाबीचा विचार करता ज्या कृषी ग्राहकाने योजनेमध्ये सहभाग घेतलेला होता परंतु त्यांनी त्या कालावधीतील चालू देयकांचा भरणा देय दिनांकानंतर व योजनेच्या कालावधीत केलेला असल्यास अशा ग्राहकांना योजनेचा लाभ घेता यावा याकरीता सक्षम अधिका-यांनी खालीलप्रमाणे मान्यता दिलेले आहे.

ज्या कृषी ग्राहकांनी जानेवारी २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील त्यांच्या चालू वीज देयकांचा भरणा संबंधित महिन्याच्या देय दिनांकानंतर परंतु '' **कृषी संजीवनी योजना २०११** '' च्या कालावधीत केलेला आहे अशा '' **कृषी संजीवनी योजना २०११** '' चे सर्व लाभ देण्यात यावेत. ''

वरीलप्रमाणे आदेश पाहता गैरअर्जदाराने देयकाच्या हिशोबातील चुकीमुळे अर्जदार कृषी संजीवनी योजना २०११ च्या लाभापासून वंचीत राहिला असे या मंचाचे स्पष्ट मत आहे त्यामुळे हा मंच खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

**१. अर्जदारास कृषी संजीवनी योजना २०११ चा लाभ देण्यात यावा व त्यापुढील आजपर्यन्तची चालु देयकाची रक्कम व्याज व दंड न आकारता एक महिनयाच्या आत देण्यात यावी.**

**२. अर्जदाराने वरीलप्रमाणे देयकाच्या रक्कमेचा भरणा एक महिन्याच्या आत करावा .**

**श्री. वि. स. काबरा**
**सदस्य**

**श्री. सु. कि. नरवडे**
**सदस्य/सचिव**